# मुकुल माधव फाउंडेशनची विशेष मुलांना भेट

## रायझिंग पुणे सुपराजायंटच्या खेळांडूना भेटण्याची संधी

पुणे : गल्फ लुब्रिकंट्स इंडिया लिमिटेडने, फिनोलेक्स इंडस्ट्री लिमिटेडचा हा सीएसआर प्रकल्प असलेल्या मुकुल माधव फाउंडेशनबरोबर भागीदारी केली आहे, याअंतर्गत 'अपंग कल्याणकारी शिक्षण संस्थे'च्या विशेष मुलांसाठी, पुणेस्थित आयपीएल फ्रांचाइजीच्या राइजिंग पुणे सुपरजायंटच्या खेळाडूंबरोबर संवादात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. स्टीव्हन स्मिथ, फाफ दु प्लेसिस आणि जयदेव उनाडकत हे टीमचे स्टार खेळाडू यासाठी उपस्थित होते. तसेच ते एनजीओच्या ३० मुलांबरोबरच्या धमाल कार्यक्रमात सहभागीही झाले होते.

## 'खेळांमुळे मुलांमध्ये कमालीच परिवर्तन घडते'

आरपीएसच्या अधिकृत वाहतूक बस 'गल्फ फॅन बस'मधून आरपीएसच्या टीमला भेटण्यासाठी मुलांना संस्थेतून कार्यक्रमाच्या ठिकाणी आणण्यात आले. येथे मुलांनी खूप धमाल खेळ खेळले आणि क्रिकेटपटूंबरोबर प्रत्यक्ष खेळण्याची संधीही त्यांना उपलब्ध झाली. मुलांमधील स्वप्ने फुलावीत यासाठी हा संवादात्मक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, यासाठी धकाधकीच्या वेळापत्रकातून खेळाडूंनी वेळ काढला होता. आपल्या आवडत्या खेळाडूंना भेटण्यासाठी मुले अतिशय उत्सुक होती. यानिमित्ताने, फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेडच्या संचालक आणि मुकुल माधव फाउंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितु छाब्रिया म्हणाल्या की, 'आमच्या संपूर्ण प्रकल्पात, खेळांनीच मुले सबळ होऊ शकतात हे आम्ही पाहात आलोय, त्यांच्यात कमालीचे परिवर्तन यामुळे घडते. आम्ही दीर्घकाळापासून अपंग कल्याणकारी शिक्षण संस्थेबरोबर संलग्न आहोत आणि आमच्या प्रकल्पासाठी आमच्या मुलांना भेटायला आंतरराष्ट्रीय ख्यातीचे क्रिकेटपटू आल्याने आम्हाला अतिशय आनंद झालेला आहे.

आम्हाला मुलांना विश्वास द्यायचाय की, काहीही अशक्य नाहीये. पुण्यातील वाहतूक पोलिसांसाठी यशस्वी हेल्मेट ड्राइव्ह केल्यावर आम्ही गल्फ ऑईलबरोबर हा दुसरा प्रकल्प केला आहे आणि मी त्यासाठी त्यांचे आभार मानते; त्यांच्याशिवाय हा कार्यक्रम शक्य झाला नसता.' यानिमित्ताने गल्फ ऑईल लुब्रिकंट्स इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक रवी चावला म्हणाले की, 'आपल्या आवडत्या क्रिकेटपटूला भेटणार म्हणून मुलांमधला उत्साह पाहून खरेच खूप बरे वाटते आहे. रायझिंग पुणे सुपरजायंटच्या या छोट्या चाहत्यांचा उत्साह वाढवणारी भावना आहे. विशेष मुलांना अशा प्रकारे मदत करणे ही क्रिकेटपटूंनी केलेली खरोखर कौतुकास्पद बाब आहे. प्रत्येक चॅम्पने क्रिकेटपटूंबरोबर सकारात्मक ऊर्जेची देवाणघेवाण केली. तीनही क्रिकेटर्स अगदी मनापासून यात सहभागी झाल्याबद्दल आम्ही त्यांचे आभार मानतो. याशिवाय मुकुल माधन फाउंडेशननेही संधी आम्हाला दिली यासाठी आम्ही त्यांचे आभारी आहोत, आणि आम्ही त्यांच्या वचनबद्धतेचे आणि ते विशेष मुलांसाठी करत असलेल्या कामाचेही कौतुक करतो.'